संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज...

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ६२ वा ● ● बुधवार दि. २० सप्टेंबर २०२३ ● ● किंमत २ रू ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे

श्राव्या डायग्नोस्टिक्स

डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी

उपलब्ध सुविधा

डॉ.सौ. चैताली सम्रेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)

डॉ. सम्रेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M..S.)

* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार

पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

## ए. एस. ट्रेडर्सचा म्होरक्या लोहितसिंग सुभेदार जेरबंद



३ हजार कोटींची फसवणूक

सांगली : दामदुप्पट परताव्याच्या बहाण्याने महाराष्ट्र, कर्नाटक, गोव्यासह सात राज्यांतील १ लाख ८५ हजाराहून अधिक गुंतवणूकदारांची सुमारे ३ हजार कोटीची फसवणूक करून नोव्हेंबर २०२२ पासून फरार झालेल्या बहुचर्चित ए. एस. ट्रेडर्स ण्ड डेव्हलपर्स व संलग्न विविध कंपन्यांचा सर्वेसर्वा तथा मॅनेजिंग डायरेक्टर लोहितसिंग धर्मासिंग सुभेदार (वय ३५, रा. किर्लोस्करवाडी रोड पलूस, जि. सांगली) याला कोल्हापूर पोलिसांनी आज (दि.१८) पहाटे अटक केली. संशयित ११ महिन्यांपासून पोलिसांना चकवा देत होता.

संशयिताच्या घटस्फोटीत पत्नीला चौकशीसाठी ताब्यात घेवून आर्थिक गुन्हे शाखेने तिच्याकडून ५० लाखाचे दागिने हस्तगत केल्यानंतर म्होरक्या सुभेदारच्या अडचणी वाढल्या होत्या. पोलिसांना चकवा देणाऱ्या म्होरक्याचा काही दिवसांपासून कोल्हापूर परिसरात वावर वाढला होता. आज पहाटे पुणे- बंगळूर महामार्गावर त्याच्या वास्तव्याचा ठावठिकाणा समजताच विशेष पथकाने सापळा रचून त्यास ताब्यात घेतले. त्याच्याकडील अलिशान मोटारही पथकाने हस्तगत केली आहे.

लोहितसिंग सुभेदारच्या अटकेबाबत पोलिस अधीक्षक महेंद्र पंडित यांनी दुजोरा दिला. याबाबतची अधिकृत माहिती बुधवारी ( दि. २० ) देण्यात येत असल्याचेही सांगण्यात आले. सुभेदारच्या अटकेबाबत तपास यंत्रणेने दुपारपर्यंत कमालीची गोपनियता पाळली होती. सायंकाळनंतर संशयिताच्या अटकेचे वृत्त शहर, जिल्ह्यात तसेच महाराष्ट्रासह अन्य राज्यात वाऱ्यासारखे पसरले. कोटच्यवधीच्या फसवणूक झालेल्या शेकडो गुंतवणूकदारांनी सायंकाळनंतर शाहूपुरी पोलिस ठाण्यांसह आर्थिक गुन्हे शाखेसमोर गर्दी केली होती.

लोहितसिंग सुभेदारसह संचालकांनी शाहूपुरी येथील दुसऱ्या गल्लीत चंद्रगंगा अपार्टमेंटमध्ये ए. एस.ट्रेडिंग ण्ड डेव्हलपर्स ( एल.एल.पी) कंपनीचे कार्यालय थाटले होते. कंपनीशी सलग्न शहरातील मध्यवर्ती परिसरात विविध शाखाही थाटल्या होत्या. कमी काळात दामदुप्पट कमाईची भुरळ घालून महाराष्ट्र, कर्नाटक, गोव्यासह सात राज्यातील व्यापारी, उद्योजक, व्यावसायिकांसह सरकारी कर्मचाऱ्यांना मोठ्याप्रमाणात गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करण्यात आले होते.

## महाराष्ट्रातील जनतेसमोरील सर्व अडथळे दूर कर:मुख्यमंत्र्यांची गणेशाचरणी प्रार्थना

मुंबई : 'विघ्नहर्ता' जनतेसमोरील सर्व अडथळे दूर कर, अशी प्रार्थना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गणपती चरणी केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गणेश चतुर्थीनिमित्त त्यांच्या निवासस्थानी श्रीगणेशाच्या मुर्तीची स्थापना केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, मी सर्व गणेश भक्तांना शुभेच्छा देतो. मी काल जम्मू-काश्मीरमध्ये होतो. श्रीनगरच्या लाल चौकात लोक गणेशोत्सव साजरा करत होते. 'विघ्नहर्ता' महाराष्ट्रातील जनतेसमोरील सर्व अडथळे दूर करील अशी मी प्रार्थना करतो.

महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरात आजपासून गणपती उत्सवाला सुरुवात झाली आहे. घरोघरी आणि सार्वजनिक ठिकाणी गणपतीच्या मूर्तीची स्थापना करून पूजा केली जात आहे. महाराष्ट्रात गणेश चतुर्थी उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. दरम्यान मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी देखील श्री गणेशाची स्थापना झाली. या वेळी मुख्यमंत्र्यांनी सहकुटुंब पुजा करून श्रीगणेशाची विधीवत पुजा केली.

## सांगली नगरीत गणरायाचे वाजतगाजत आगमन

सांगली : मंगलमूर्ती मोरया, एक, दोन, तीन, चार, गणपतीचा जयजयकार अशा जयघोषात आज, मंगळवारी घरोघरी लाडक्या बाप्पाचे आगमन होत आहे. ढोल, ताशाच्या गजरात, पारंपरिक वेशभूषेत लहान-थोर, मुली, महिलांनी चैतन्यमयी वातावरणात बाप्पाचे स्वागत केले. सकाळपासूनच घरगुती गणपती आणण्यासाठी सांगलीतील शहरातील प्रमुख रस्ते गर्दीने भरून गेले आहेत. गणपतीच्या आगमनासाठी शहरवासिय उत्साहाने सज्ज झाले आहेत. आरास, नैवेद्य, पूजा करून श्री गणेशाची प्रतिष्ठापना केली जात आहे. प्रमुख मार्ग, चौक गर्दीने ओसंडून वाहू लागले आहेत. गणेशाच्या स्वागतादरम्यान पारंपारिक वाद्याच्या दणदणाटाने सारा परिसर दुमदूमन गेला. गणेशोत्सवाच्या जल्लोषाने सारे शहर व्यापून गेले आहे.

दरम्यान कडेगांव शहरातील सार्वजनिक व घरगुती गणेशाचे उत्साहात आगमन झाले झांज पथक व बॅण्ड यांच्या निनानाद आगमन झाले कडेगांव नगरीचा राजा, नगराध्यक्ष धनंजय देशमुख भैय्या यांच्या लिबर्टी मंडळाची मिरवणूक पोलिस निरीक्षक शहाणे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आली या मंडळाने पारंपरिक झांज पथक व बॅण्ड लावून मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत मुस्लिम तरूणांचा ही सहभाग होता.आशपाक पठाण, नगरसेवक हाजी मुक्तार पटेल, सादीक मुल्ला, मेहेरबान नासिर पटेल यांच्या सह विविध मंडळांच्या ठिकाणी मुस्लिम युवक मोठ्या प्रमाणात सहभागी होवून कडेगांव शहर हे हिन्दू मुस्लिम ऐक्याचे प्रतिक आहे हे



दाखवून दिले.

तसेच शिवाजी गणेश मंडळ, नवभारत गणेश मंडळ, हनुमान गणेश मंडळ, जिद्द गणेश मंडळ, भैरवनाथ मंदिर गणेश मंडळ, श्रीराम गणेश मंडळ, विद्यानगर गणेश मंडळ या मोठ्या मंडळांच्या मिरवणुकीने प्रतिष्ठापना करण्यात आली. तसेत घरगुती गणेश मुर्ती व सजावट यासाठी लोकांनी शुक्रवार पेठेत मोठी गर्दी केली होती.

तसेच शिवाजी गणेश मंडळ, नवभारत गणेश मंडळ, हनुमान गणेश मंडळ, जिद्द गणेश मंडळ, भैरवनाथ मंदिर गणेश मंडळ, श्रीराम गणेश मंडळ, विघानगर गणेश मंडळ या मोठ्या मंडळांच्या मिरवणुकीने प्रतिष्ठापना करण्यात आली. तसेत घरगुती गणेश मुर्ती व सजावट यासाठी लोकांनी शुक्रवार पेठेत मोठी गर्दी केली होती.

व्यापारी यांनी विविध प्रकारचे साहित्य ठेवण्यासाठी ठेवले होते.तसेच यावर्षी चायना मेड वस्तू मोठ्या प्रमाणात नव्हताच यासाठी व्यापारी व ग्राहक यांनी फाटा दिला तसेच इकोफ्रेंडली गणेश मुर्ती खरेदी करण्यावरही ग्राहकांचा भर होता.

## प्रतीक पाटील यांच्या लोकसभा उमेदवारीबाबत जयंत पाटीलांनी स्पष्टच सांगितलं

कोल्हापूर : हातकणंगले लोकसभा मतदारसंघात इंडिया आघाडीकडून प्रतीक पाटील यांना उमेदवारी देण्याबाबतचा भूमिका योग्य वेळी घेतली जाईल. याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार फक्त शरद पवारांना आहे. ते योग्य वेळी निर्णय घेतील, असे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी केले.

औरवाड (ता. शिरोळ) येथे राज्यसभा खासदार डॉ. फौजिया खान यांच्या फंडातून हजरत शेख चॉंद पीर दर्गा येथे सभागृह बांधकामासाठी दहा लाखांचा निधी मंजूर झाला आहे. त्याची पायाभरणी आमदार जयंत पाटील यांच्या हस्ते करण्यात आली. या वेळी माजी आमदार उल्हास पाटील, सांगलीचे माजी महापौर मैनुद्दीन बागवान, युवक राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष रोहित पाटील, अशरफ पटेल प्रमुख उपस्थित होते.



माजी आमदार उल्हास पाटील यांनी येणाऱ्या काळात कॉंग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेनेच्या माध्यमातून पुरोगामी महाराष्ट्र घडविण्यासाठी जनतेने साथ द्यावी, असे आवाहन केले. या वेळी रोहित पाटील, मदन कारंडे, मैनुद्दीन बागवान यांनी मनोगते व्यक्त केली. याप्रसंगी अभिजित पवार, विक्रमसिंह जगदाळे, आबीद पटेल, माजीद पटेल, नागेश कोळी, किरण कांबळे, प्रशांत मंगसुळे, कमरूदीन पटेल, शहानवाज पटेल यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून प्रतीक पाटील यांना उमेदवारी द्यावी, अशी मागणी, अभिजित पवार, नागेश कोळी, हजरत पटेल यांच्यासह कार्यकर्त्यांनी केली. या वेळी आमदार जयंत पाटील यांनी याबाबत थेट नकार दिला नाही. मात्र, याबाबतचा निर्णय शरद पवार यांच्या कोर्टात ढकलला आहे. यामुळे हातकणंगलेतून तिसरा पर्याय म्हणून प्रतीक पाटील यांचे नाव पुढे येत आहे.

## सांगलीत कृष्णा नदीचे पात्र पडले कोरडे, गणेश मुर्ती विसर्जनाची चिंता

सांगली : शहरात गणरायाचे उत्साहात स्वागत झाले असून यंदाच्या गणेशोत्सवामध्ये नदीपात्रात मुर्ती विसर्जन करू नये, यासाठी महापालिकेकडून जनजागृती केली जात आहे. शहरातील कृष्णा नदीत मुर्तीचे विसर्जन केल्याने प्रदुषणात वाढ होणार आहे. त्यात नदीपात्रात पाण्याची पातळी असल्याने विसर्जनाची चिंता लागली आहे. त्यासाठी महापालिकेने कृत्रिम कुंड, तलावाची व्यवस्था केली आहे.

गणेशोत्सवाला सुरूवात झाली असून शहरातील सरकारी घाट, विष्णू घाट, स्वामी समर्थ घाट, मिरजेतील कृष्णा घाटावर दीड दिवस, पाचवा, सातवा, नववा आणि अकराव्या दिवशी गणेश मुर्तीचे विसर्जन केले जाते. त्यासाठी महापालिकेने सर्वच घाटांची स्वच्छता केली आहे. घाटावर विसर्जनासाठी मोठी गर्दी होत असते. त्यातच कृष्णा नदीच्या पाण्याची पातळी खालावली आहे. नदीपात्रात चार ते पाच फुटच पाणी आहे. त्यामुळे गणेशमुर्तींचे विसर्जन निर्विघ्नपणे पार पाडण्याची चिंता महापालिकेला लागली आहे. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमुर्ती पाण्यात विरघळत नाहीत. त्यात रासायनिक रंगाचीही वापर केला जातो. अनेकजण नदीच्या पाण्यात निर्माल्य टाकतात. त्यामुळे नदीचे प्रदुषण वाढण्याची भीती आहे. त्यासाठी महापालिकेने गणेश मंडळासह नागरिकांत जनजागृती केली असून विसर्जनासाठी ठिकठिकाणी कृत्रिम कुंड, तलावाची व्यवस्था केली आहे.

## चांदोली धरण शंभर टक्के भरले

सांगली : कोल्हापूर व सांगली जिल्ह्यासाठी वरदान ठरलेले व ३४ . ४० टी.एम . सी . पाणीसाठवण क्षमता असलेले चांदोली ( वारणा ) धरण अखेर सोमवारी शंभर टक्के भरले आहे . कमी पर्जन्यमानामुळे गतवर्षीच्या तुलनेत यंदा हे धरण उशीरा भरले आहे . हे धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील वारणा नदीकाठच्या शेतकरी वर्गातुन समाधान व्यक्त होत आहे .

गेल्या एक महिन्यापासुन पावसाने हुलकावणी दिल्याने या धरणातील पाण्याचा विसर्ग पूर्णपणे बंद करण्यात आला होता . सोमवारी सकाळपासुन या धरण क्षेत्रात पावसाचा जोर होता . सोमवारी सायंकाळी ४ वा . पर्यंत धरण क्षेत्रात १४ मि. मी . पावसाची नोंद झाली आहे . आजअखेर धरण क्षेत्रात १६३४ मि. मी . एवढा पाऊस झाला आहे . सध्या धरणात ११०२ क्युसेक पाण्याची आवक होत आहे .धरणात पाण्याची आवक वाढल्याने या धरणातील पाणी साठ्यात वाढ होऊन सोमवारी सायंकाळी हे धरण पुर्ण क्षमतेने भरले आहे .

## तासगाव रथोत्सवातील सहभागासाठी अदिती पटवर्धनांना परवानगी

सांगली : तासगाव येथील श्री. गणपती पंचायतन देवस्थानच्या रथोत्सवात सहभागी होण्यावरून श्रीमंत राजेंद्र पटवर्धन यांच्या कुटुंबात वाद निर्माण झाला होता. त्यावर कोल्हापूर येथील धर्मादाय सहआयुक्त यांच्यापुढे सुनावणी झाली. त्यानुसार अदिती पटवर्धन यांना यंदाच्या रथोत्सवात सहभागी होण्यास परवानगी देण्यात आली आहे.

श्री. गणपती पंचायतन देवस्थानच्या तासगाव येथील रथोत्सवापूर्वी वाद निर्माण झाला होता. त्यानंतर देवस्थान न्यासाचे महाप्रबंधक पवनसिंह कुडमल यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला होता. संबंधित हल्लेखोरांवर गुन्हा दाखल करून त्यांना तातडीने



अटक करण्याची मागणी देवस्थानच्या विश्वस्तांनी केली होती. त्यानंतरही पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास विलंब केला. तसेच, हल्लेखोरांना आतापर्यंत अटक केली नसल्याने आमच्या सुरक्षेला धोका आहे. जोपर्यंत हल्लेखोरांना अटक होणार नाही. तोपर्यंत अदिती पटवर्धन यांना रथोत्सवात सहभागी होण्यास परवानगी देऊ नये, अशी मागणी देवस्थानचे अध्यक्ष राजेंद्र पटवर्धन यांनी केली होती. त्यावर सांगली येथील धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे वडील राजेंद्र पटवर्धन विरुद्ध मुलगी अदिती पटवर्धन या वादावर सुनावणी सुरू आहे.

दरम्यान, कोल्हापूर येथील धर्मादाय सहआयुक्त यांच्याकडे सुनावणी झाली. त्यावर यावर्षीच्या रथोत्सवात अदिती पटवर्धन यांना सहभागी करून घ्यावे. तसेच, याठिकाणी कोणताही वाद निर्माण होऊ नये. यासाठी कायदा-सुव्यवस्थेची जबाबदारी सांगली पोलिस आयुक्त कार्यालयाने घ्यावी, असे आदेश धर्मादाय सहआयुक्त निवेदिता पवार यांनी नुकतेच दिले आहेत.

## सांगली जिल्ह्यात ५२ बोगस खते, बियाण्यांबद्दल न्यायालयात दावा

सांगली : जिल्ह्यात १०० टक्के पेरण्या झाल्या नसल्या तरी हंगामासाठी आलेले खते, बियाणे आणि किटकनाशकांमध्ये अप्रमाणितपणा (बोगस) आढळून आले आहेत. जिल्ह्यातील बहुतांशी दुकानांमध्ये विक्रीसाठी आलेल्या एक हजार ४०० नमुन्यांची तपासणी केली असून त्यामध्ये खतांचे ३८, बियाणे ९ आणि किटकनाशकांचे ५ नमुने बोगस असल्याचे स्पष्ट झाले. तपासणीमध्ये त्रुटी आढळल्याने ५२ नमुन्यांप्रकरणी न्यायालायत दावा दाखल केल्याचे कृषी विभागाने सांगितले.

खरीप हंगामासाठी कृषी विभागाने खते आणि बियाण्यांची मागणी केली आहे. खतांचा पुरवठा आणि विक्री होताना शेतकर्यांना त्रास होणार नाही, याबाबतची दक्षता घेण्यात आली. जिल्ह्यात खताचे होलसेल व किरकोळ असे मिळून पाच हजार १७५ वितरक आहेत. हंगामाच्या पार्श्वभूमीवर मे महिन्यापासून नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले होते. निविष्ठा गुणनियंत्रण कामकाजासाठी जिल्ह्यात गुणनियंत्रण निरीक्षक व अकरा भरारी पथका मार्फत निविष्ठा वितरकांचे तपासणी व बियाणे खते औषधे नमुने काढण्याची कार्यवाही केली. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर जे वितरक विहित कालमर्यादेत परवाना नुतनीकरण केलेले नसल्याचे स्पष्ट झाले. परवान्याची मुदत संपल्यानंतरही दुकानातून विक्री करण्यात आली त्यांच्यावर कारवाई केली होती.

पेरण्या झाल्या नसल्या तरी कृषी सेवा केंद्रामध्ये विक्रीसाठी आलेल्या खते, बियाण्यांची तपासणी कृषी विभागाकडून करण्यात आली आहे. जिल्ह्यात तीन प्रकारच्या सुमारे चौदाशे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले होते. तपासणीसाठी खतांचे तब्बल एक हजार १०० नमुने तपासले असून त्यापैकी ३८ नमुने अप्रमाणित असल्याचे आढळून आले. बियाण्यांचे ३३५ नमुन्यांनंतर ९ बोगस आणि किटकनाशकांचे २१३ नमुन्यांची तपासणी केली, त्यामध्ये पाच नमुने बोगस असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे सदोष खते, बियाणे आणि किटकनाशकास विक्री बंदचे आदेश देण्यात असून याप्रकरणी संबंधित कंपन्यांविरोधात न्यायालयात दावा दाखल करण्यात आला असल्याचे कृषी विभागाच्यावतीने सांगण्यात आले.

कृष्णा आणि वारणा नदीकाठी पाण्याची सुविधा असल्याने जिल्ह्याच्या पश्चिम भागात पेरण्या पूर्ण झाल्या. परंतु पूर्व भागाला पावसाने हुलकावणी दिली आहे. त्यामुळे एक लाख हेक्टर क्षेत्र नापेर राहिले. जिल्ह्यात युरिया खताचा मुबलक साठा उपलब्ध असतानाही वाळवा, शिराळा, तासगाव तालुक्यातील शेतकर्यांना युरियाची गोणी जादा दराने विकत घ्यावे लागली होती. याकडे कृषी विभागाने दुर्लक्ष का केले, असा सवालही शेतकऱ्यांनी केला आहे.

श्री कॉम्प्युटर

● हार्डवेअर
● नेटवर्किंग
● सॉफ्टवेअर
● सर्विलेन्स सिस्टम
● सी.सी.टी.व्ही.

पत्ताः वरद निवास कोष्टी गल्ली मेन रोड,आटपाडी. ता.आटपाडी जि.सांगली (महाराष्ट्र) ४१५३०१ मो.नं.९८९०५८५७६१




कॉम्प्युटर फक्त १०,०००/-* रू.

दैनिक माणदेशी बुलंद आवाज...
माणदेश एक्सप्रेस
• बुधवार दि. २० सप्टेंबर २०२३ •


## सं | पा | द | की | य

### बेरोजगारी इथली संपत नाही

देशामध्ये बेरोजगारीचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढले असून, बेरोजगारी सारखी मोठी समस्या युवकांच्या जणू पाचवीलाच पूजली आहे. येथील प्रशासन व सत्ताधारी आश्वासनांचे गाजर व कागदी घोडे नाचवण्याशिवाय काहीच करत नाही. दरवर्षी कित्येक डॉक्टर, इंजिनियर, पदवीधारक पदवी घेऊन रोजगार मिळवण्यासाठी बाहेर पडतात. परंतु शेवटी त्यांच्या हाती नैराश्याशिवाय काहीच मिळत नाही. खाजगी नोकरी असो व शासकीय नोकरी येथील रिक्त पदांच्या एका जागेसाठी दहा हजार अर्ज प्राप्त झालेले असे बरेच उदाहरणं आहेत. देशांमध्ये एवढी मोठी गंभीर समस्या असतांना, प्रशासन व सत्ताधारी हातावर हात ठेवून गप्प बसले आहेत. एकमेकांवर टिका करण्यात सत्तेतले पाच वेर्षे कसे निघून जातात यांचं यांनाच कळत नाही. बघ्यांची भूमिका घेऊन बसलेले सत्तेमध्ये येताना विरोधकांच्या नाकर्तेपणाचे भांडवल करून सत्तेवर येतात व शेवटी जैसे थे असाच प्रकार घडत असल्यामुळे कित्येक तरुणांना रोजगार मिळत नाही त्यामुळे आत्महत्येचे पाऊल उचलले जात आहे. भारत महासत्तेची स्वप्न पाहतोय. भारत मंगळवार यान पाठवून तेथे शोध मोहीम सुरू करून वेगवेगळे शोध लावण्याचे स्वप्नं पाहतोय. परंतु येथील व्यवस्थेला दिव्याखालचा अंधार मात्र दिसत नाही. अनेक माध्यमं आहेत, हीच माध्यमं वेळोवेळी प्रशासनाला व संबंधितांना आजपर्यंत सूचित करण्यात आलंय तसेच या गंभीर समस्येबाबत जाबही विचारत आलंय, तरीही अशा गंभीर विषयाकडे कोणालाही पाहायला मुळीच वेळ नाही. या देशांमध्ये कोणत्याही गोष्टीचे राजकारण होत असल्यामुळे याचे अनेक निर्दोष बळी जात असल्याचे आपण कित्येकदा पाहीलंय. ज्यांच्यावर अन्याय झाला त्यांना या देशांमध्ये न्याय कधीच मिळाला नाही. खाजगी क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या तरुणांना खाजगी नोकरी सल्ला केंद्र व संबंधित सेवा पुरवणाऱ्या संस्था नोकरी मिळविण्याचे आमिष दाखवून अमाप पैसा घेऊन फसवणुकीचे प्रकार करून जणू गोरगरिबांच्या खिशावर दरोडा टाकण्याचा षडयंत्र करत आहेत. दिवसालागणीक कित्येकांना नोकरीला म्हणून फसवणुकीचे प्रकार करणाऱ्यांच्या विरोधात आपल्या देशातील सायबर सेल जणू झोपा काढत आहे. युवकांना नोकरी लावतो म्हणून फसवणूक झाल्याचे समोर आले, कित्येकांचे पैसे बुडाले, परंतु त्यांना आजही न्याय मिळाला नसल्याने सायबर च्या विभागावर तरुणाई शंका व्यक्त करत आहे. दिवसेंदिवस जर असेच घडत राहिले तर नोकरी वाचून अनेक तरुण वंचित राहतील व देश महासत्ता कधीच होणार नाही. कारण या देशाचा आधारस्तंभ हा युवक आहे. या युवकांवर जर अन्याय होत असेल त्यांना पोट भरण्यासाठी नोकरी मिळत नसेल तर देश महासत्ता होईलच कसा ? याबाबत नक्कीच विचार करायला हवा. अशा प्रकारचा एखादा विषय शासन दरबारी मांडला असता काही दिवसांनी एखादी भलतीच बातमी येते व अशा प्रकारच्या समस्या बाबत न्याय न देता दिशाभूल करण्याचे राजकारण आपल्या देशामध्ये होत आहे. स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या परीक्षा बेरोजगारी वाढली असल्यामुळे एका परीक्षेचे स्वरूप दोन वेळा केल्यामुळे त्यातही अनेक वेळ जात आहे याला फक्त बेरोजगारीच जबाबदार आहे. याला पर्याय देणे शासनाचे आद्य कर्तव्य आहे. परंतु असे होताना मुळीच दिसत नाही बेरोजगारी वाढल्यामुळे कित्येक उच्च पदवी धारक सुद्धा परिचय, शिपाई, माळी काम, ड्रायव्हार, कारकून अशा इ. वर्ग ३ च्या पदासाठी अर्ज करताना दिसत आहेत. हि या देशातील शासन व्यवस्थेला खाली मान घालायला लावणारी गोष्ट आहे. शिवाय देशात उच्चशिक्षण घेऊनही शासकीय नोकरी मिळवताना परिचर पदासाठी एखादा पीएचडी झालेला व्यक्ती अर्ज करत असेल तर देशांमध्ये बेरोजगारीबाबत अशा प्रकारचे भयान वास्तव असल्याचे एकूणच दिसून येते. यावर विचार व्हायलाच हवा !

# विश्वकर्मा बांधकाम कामगार आरोग्य सेवा योजना

गणेशोत्सव आला की दरवर्षी अनेक प्रश्न चर्चिले जातात! त्यावर, उपाय सुचवले जातात... मात्र, यातून निष्पन्न काही होत नाही. गणेशोत्सव आला की, साधक-बाधक चर्चांना प्रारंभ होऊन त्या उत्तरोत्तर खूप रंगू लागतात. भारतातील व विशेषत: हिंदू धर्मातील हा एकच उत्सव असा आहे व असतो, की जो समाजमनावर सातत्याने प्रभाव जमवून आहे! हा उत्सव म्हणजे महाराष्ट्राचा मूळ श्वासोच्छ्वास आहे! हा उत्सव होत राहणे याचा अर्थ महाराष्ट्राचे चलनवलन गतिमान असणे असा होतो.....

या गणेशोत्सवाला 'सार्वजनिक' स्वरूप लोकमान्य टिळक यांनी देण्याच्या आधीच घराघरांतून गणेशचतुर्थीला मातीची मूर्ती आणून, तिचे एक-दीड दिवसांत विसर्जन होत होते... पेशवाईत दहा दिवसांचा, शनिवारवाड्यात, थाटात उत्सव होऊन गणेशमूर्तीचे विसर्जन नदीपात्रात होत होते; तरी या उत्सवाला तसे 'सार्वजनिक' स्वरूप नव्हते. याचा अर्थ सन १८९४ साली लोकमान्यांनी या 'घरगुती' उत्सवाला सार्वजनिक स्वरूपाचे प्रोत्साहन देईपर्यंत हा उत्सव तसा खासगी व एक-दीड दिवसांचा होत होता....!



गणेशमूर्ती शाडूच्या मातीच्याच हव्यात काय? त्या कागदाच्या लगद्यापासून केल्या तर चालणार नाहीत काय? गणेशमूर्तीचे विसर्जन समुद्राऐवजी छोट्या तलावांमध्ये किंवा घरातील छोट्या जलसाठ्यात किंवा छोट्या पिंपात केले तर? वार्षिक गणेशमूर्ती दरवर्षी समुद्रात व पाण्यात विसर्जित केलीच पाहिजे का? एकच गणेशमूर्ती दरवर्षी वापरली तर काय व कोणाची हरकत? प्रत्येक घरात एक गणेशमूर्ती न आणता संपूर्ण गावानेच एक मूर्ती आणून उत्सव का करू नये? हा उत्सव साधेपणाने करावा की थाटामाटात....?

हे आणि असे अनेक प्रश्न दरवर्षी साग्र-संगीत चर्चिले जातात..! त्यावर पर्याय सांगितले जातात, उपाय सुचवले जातात, मात्र यातून निष्पन्न काही होत नाही! मूर्तीच्या उंचीबाबतही तेच.....

हिंदू धर्मात देव-देवता असंख्य आहेत... एक गणेश दैवत सोडले तर इतर कोणत्याही देव-देवतांचे आगमन-विसर्जनाचे सोपस्कार व पथ्य नाही! आणि हेच या गणेश देवतेचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य! शंकर, विष्णू, देवी, लक्ष्मी, सरस्वती, राम, कृष्ण इत्यादी देवतांचे आगमन असले तरी तेथे गाजावाजा नाही! या मूर्ती आणायच्या त्या एखाद्या मंदिरात नाहीतर मठात कायमच्या प्रतिष्ठित-स्थापना करण्यासाठी! त्यालाच 'देवतेची प्रतिष्ठापना' असे म्हणतात. जेथे प्रतिष्ठापना असते तेथे विसर्जन संभवत नाही. शिवाय या देवतांच्या मूर्ती मातीच्या नसून दगडी किंवा धातूच्या असतात. मुळात या मूर्ती विसर्जनासाठी नसतातच! गणेशोत्सवात जी मूर्ती घरी आणायची तीच मातीची असते; आणि जी मातीची मूर्ती असते तिचेच मोठ्या थाटात, पण जड अंत:करणाने पाण्यात विसर्जन करावयाचे असते.....

माती साधी असो, तिची मूर्ती असो, मातीची जात व प्रकार कोणताही असो, ती पाण्यात पडली की विरघळणारच! यात आजवर तरी बदल झालेला नाही! मात्र, न विरघळणारे प्रकार त्याज्य मानायला हवे.....

गणेश देवतेचे, गणेशव्रताचे, गणेशपूजनाचे व गणेशोत्सवाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य असे की, येथे या गणेश देवतेला मातीच्या रूपात साकार-सावयव असे मूर्तिरूप देऊन गणेशचतुर्थीला, म्हणजे भाद्रपद महिन्याच्या शुद्ध चतुर्थीला, वाजत-गाजत घरी, म्हणजे आपल्या माहेरी आणावयाचे; आणि ठराविक दिवशी त्या आवाहन- पूजन केलेल्या मूर्तीचे पुन: थाटात विसर्जनही करावयाचे! आवाहन-आगमन-पूजन-भजन-आरती आणि शेवटी विसर्जन, हेच या मूर्तीचे महत्त्वाचे व प्रधान वैशिष्ट्य आहे व असतेही! प्रत्येक वर्षी गणेशाची मूर्ती नवीन, तिचा साज नवीन, थाट नवीन, रूप नवीन, म्हणून उत्साहही नित्यनूतन व टवटवीत! गणेशाच्या या चिरंतन नावीन्याचे परमभाग्य राम-कृष्ण, शंकर, देवी, लक्ष्मी या इतर एकाही देवतेच्या लल्लाटी नाही.....

गणेशमूर्ती मातीच्याच हव्यात काय? या प्रश्नाचे उत्तर 'होय' असे सकारात्मक असले तरी वार्षिक गणेशमूर्ती ही पाण्यात विरघळणारी हवी, ही अट महत्त्वाची... गणेशमूर्ती कशाचीही घडवा, ती विसर्जन केल्यानंतर पाण्यात विरघळली पाहिजे. तसे होत नाही तेव्हाच प्रदूषणाचा प्रश्न उपस्थित होतो.....

गणेशमूर्तीचे विसर्जन समुद्र, नदी, सरोवर, तलाव, जलाशय, कालवा, ओढा, धबधबा अशा कोणत्याही ठिकाणी केले तर चालते; पण यापैकी एकही सोय नसल्यास घरच्या घरी पिंपात, टाकीत मूर्तीचे विसर्जन केले तरी चालेल... यासाठी वेगळा शास्त्रार्थ शोधण्याची गरज नाही.....

गणेशमूर्ती दरवर्षी नवीन केलेली घरी आणली पाहिजे... एकच मूर्ती दरवर्षी गणेशचतुर्थीला वापरायची तर मग या वार्षिक उत्सवात नावीन्य ते काय? मंदिरात अशा कायमच्या मूर्ती पूजेसाठी असतातच की.....

उत्सावाचे स्वरूप कसे असावे यावर दोन्ही बाजूंनी चर्चा होतात... परंतु याबाबत एक म्हणता येईल, घरातील वास्तुशांत, बारसे, साखरपुडा, लग्नसमारंभ, उद्घाटन प्रकाशन, यात्रा, मेळावे, सहली हे सर्व प्रकार फार साधेपणाने कोणी करतात का? मग देवाच्या उत्सवातच काटछाट का? कोणीही कुठेही उधळपट्टी करूच नये हे मान्य; पण अत्यावश्यक ठिकाणीही काटकसर, कंजुषी, काटछाट करणे म्हणजे दरिद्री असा करंटेपणा ठरेल. उत्सव म्हटल्यावर त्यात सजावट, वाजंत्री अशा गोष्टी येणारच, त्याचा फार बाऊ होऊ नये आणि सजावटीचा अतिरेकही होऊ नये.....

संपूर्ण गाव छोटे असेल, सर्व गावकऱ्यांची एकजूट असेल, व सर्वानुमते मान्य असेल तर 'एक गाव-एक गणपती' ही कल्पना प्रत्यक्षात आणावी; परंतु गावातील कोणाचा अहंकार केव्हा डोके वर काढील, आणि कोणाची अहंता कधी जखमी होईल त्याचा भरवसा नसतो... म्हणून तानमान पाहून व तारतम्यानेच अशा योजना कराव्यात.....

गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप आले पारतंत्र्यात... त्यामुळे माजघरातला उत्सव सार्वजनिक झाला, तरी अगदी प्रारंभी भजन, कीर्तन, प्रवचन, मग सामूहिक मेळे असे अगदी साधे स्वरूप होते. समाजातील सर्व घटकांनी एकत्र यावे, सर्वांनी एकजुटीने विचार करावा, नवीन उपक्रम राबवावा एवढीच माफक अपेक्षा प्रारंभी होती. नंतर असा उत्सव यशस्वी होत आहे असे दिसताच समाज-प्रबोधनासाठी व्याख्यान, चर्चा, संवाद असे उपक्रम सुरू झाले. हे प्रबोधन साधारण सन १९६० पर्यंत निर्विघ्न पार पडत असे! पण पुढे व्याख्यानाऐवजी पौराणिक, ऐतिहासिक देखाव्यातून, प्रत्यक्ष दृक्-श्राव्य माध्यमातून प्रबोधनाची वेगळी 'टूम' प्रथम पुण्यात सुरू झाली; आणि एकूण या उत्सवाचा पवित्र ढाचाच बदलून त्याला बाजारी स्वरूप आले! काळ बदलतो तशा सजावटीच्या कल्पना बदलतात, हे काही प्रमाणात मान्य आहे. परंतु गणेशोत्सवातील एखाद्या गोष्टींवर टीका होते, तेव्हा ती योग्य असेल तर तिची दखल घेतली पाहिजे. परंतु हा उत्सव साजरा करण्याकडे समाजमनाचा कल असतो, आणि त्यात काहीच गैर नाही....

**श्री मोहन राजाराम पवार मुख्याध्यापक,**
**जिल्हा परिषद शाळा सिद्धार्थनगर आरळा**

# आयुक्त, उपायुक्त व नगर साचिवा वर ॲट्रॉसिटी कायद्याखाली गुन्हा दाखल करण्याचा तक्रार अर्ज सांगली शहर पोलीस स्टेशनमध्ये दाखल

सांगली : मुंबई उच्च न्यायालयाने आठ वर्षांपूर्वी सांगली शहरातील तेराशे बेघारांना घरे द्यावीत असा आदेश केलेला आहे. परंतु त्या आदेशाची अंमलबजावणी अद्याप महानगरपालिकेने केलेली नसून संमिकू महानगरपालिकेचे प्रशासन दररोज मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करीत आहे. शेवटी महानगरपालिकेने तीन वर्षांपूर्वी त्यातील १३९ बेघरांना घरे देण्याचा निर्णय केला. तसा ठरावही केला. त्या १३९ मंजूर यादी मध्ये श्रीमती रंजना बाळासाहेब वाघमारे या मागासवर्गीय महिलाचां सुद्धा समावेश आहे. तिने तिच्या घरासाठीच्या हिश्याची तीन हजार रुपये रक्कम महानगरपालिकेमध्ये भरलेली असून तिला वाल्मिकी आंबेडकर नगर मधील घरकुल दिलेले आहे. असे प्रमाणपत्र दिलेले आहे. हे प्रमाणपत्र देऊनही वर्षे होत आल तरी अद्याप ज्या ठिकाणी घरकुल दिलेले आहे त्या फ्लॅट ला दारे, खिडक्या, बाथरूम शौचालय व फरशी नाही. त्या जागेचा वापर शौचालयासाठी केला जात आहे. हे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना अनेक वेळा दाखवून दिले. तरीही अधिकारी काहीही करीत नसून एक प्रकारे महानगरपालिकेचे प्रशासन मुंबई उच्च न्यायालयाचे आदेशाची अंमलबजावणी होऊ नये असे कारस्थान करीत आहे. म्हणूनच या अन्याय अत्त्याचार विरोधी रंजना बाळासाहेब वाघमारे हिने तारीख १९ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी बारा वाजता सांगली शहर पोलीस स्टेशन मध्ये सामीकू महानगरपालिकेचे आयुक्त श्री सुनील पवार, नगरसचिव भगवान पांडव, सहाय्यक आयुक्त दत्तात्रय गायकवाड व उपायुक्त यांच्यावर त्वरित ट्रॉसिटी कायद्याखाली गुन्हा दाखल करावा असा अर्ज दाखल केलेला आहे. याबाबत पोलिसांनी चौकशी करून कारवाई करण्यात येईल असे आश्वासन दिलेले आहे.

महानगरपालिके मार्फत १३९ सांगली शहरात राहणाऱ्या कुटुंबीयांना वाल्मी आंबेडकर वसाहत सांगली येथील घरकुले देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार घेण्यात आलेला आहे.



याबाबत १३९ कुटुंबीयापैकी ३३ कुटुंबीयांना इमारतीचा ताबा देण्याच प्रमाणपत्र तारीख २२/३/२०१९ रोजी सांगली मिरज कुपवाड महानगरपालिके चे सहाय्यक आयुक्त श्री दत्तात्रय गायकवाड यांनी संघटनेचे अध्यक्ष कॉ शंकर पुजारी अध्यक्षांना दिलेले आहेत. प्रत्यक्षात मात्र ताबा देऊनही त्या ठिकाणी कसलीही व्यवस्था नाही.

रंजना बाळासाहेब वाघमारे यांनी सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेने ठरवल्यानुसार जे मंजूर घरकूल लाभार्थी आहेत त्यांचा ३००० रुपये हिस्सा महानगरपालिकेच्या बँक खात्यावर भरलेला असून त्याबाबत प्लॉट दिल्याचा ताब्याचे प्रमाणपत्र रंजना बाळासाहेब वाघमारे यांना देण्यात आलेले आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र वालमी आंबेडकर वसाहतीमध्ये इमारत क्रमांक २८ येथे अत्यंत भयानक परिस्थिती आहे.

वाल्मी आंबेडकर वसाहतीमध्ये इमारत क्रमांक २८ या ठिकाणी लाभार्थी राहण्यास येऊ नये यासाठी या इमारतींचा शौचालय म्हणून वापर केला जात आहे. असे होऊ नये म्हणून अनेक वेळा सांगली महानगरपालिकाकडे तक्रार करून सुद्धा महानगरपालिके मार्फत काहीही कारवाई करण्यात आलेली नाही. इतकेच नव्हे तर या दोन्ही इमारती दुरुस्ती करण्यासाठी ज्या कंत्राटदाराला टेंडर दिलेले आहे तो कंत्राटदार सुद्धा त्या ठिकाणी शौचालयाचा वापर होत असल्यामुळे ते दुरुस्त करू शकत नाही. असे त्यांनी सांगितलेले आहे.

(पान १ वरून)

## महाराष्ट्रातील जनतेसमोरील सर्व अडथळे दूर कर

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सुखकर्ता, विघ्नहर्ता श्रीगणरायांच्या चरणी वंदन केले असून राज्यातील जनतेला श्री गणेश चतुर्थी आणि श्रीगणेशोत्सवाच्या भक्तीमय शुभेच्छा दिल्या आहेत. श्रीगणरायांच्या आगमनासोबत घराघरात धनधान्याची समृध्दी येईल. समाजात आनंद, उत्साह, भक्ती, चैतन्याचं वातावरण निर्माण होईल, असा विश्वासही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे. भक्तिमय वातावरणात साजरा होत असलेला गणेशोत्सव निसर्गाची काळजी घेत पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करावा, असे आवाहनही उपमुख्यमंत्र्यांनी केले आहे.

श्री गणेशोत्सवानिमित्त दिलेल्या शुभेच्छा संदेशात उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणतात, श्री गणेश चतुर्थी सणाला, सार्वजनिक गणेशोत्सवाला सामाजिक एकतेची, समाजप्रबोधनाची, राष्ट्रभक्तीची, गौरवशाली परंपरा लाभली आहे. ही परंपरा अधिक वृद्धिंगत करतानाच नागरिकांनी समाजातील सर्वांना सोबत ठेवून गणेशोत्सव साजरा करावा. श्री गणपती बाप्पा म्हणजे बुद्धीची देवता आणि आपण सर्व श्रीगणरायांचे भक्त आहोत. त्यामुळे, गणपती बाप्पांचा उत्सव त्याच पद्धतीने साजरा झाला पाहिजे. कुटुंबातील, नात्यातील, मित्रपरिवारातील, समाजातील सर्वांनी मतभेद, मनभेद विसरून, एकत्र येऊन, समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन आनंदात, भक्तीमय वातावरणात गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन अजित पवार यांनी केली.

राज्यातील काही भागात अजूनही पुरेसा पाऊस पडला नाही. राज्यात चांगला पाऊस पडावा, शेतकऱ्यांवरील हे संकट दूर व्हावे. शेतात धान्याच्या आणि घरात धनाच्या राशी याव्यात. यंदाचा गणेशोत्सव शेतकऱ्यांसह आपल्या सर्वांच्या जीवनात, सुख, समृद्धी, आनंद, उत्साह, चैतन्य घेऊन येवो. श्री गणरायांच्या कृपेनं तुमच्या मनातल्या सर्व इच्छा, आकांक्षा पूर्ण होवोत, अशी प्रार्थनाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी श्रीगणरायांच्या चरणी केली आहे.

# कष्टकऱ्यांची लढाई ची डिझाईन नव्याने करण्याची गरज : कुंभार

कडेगाव : देशाच्या स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष साजरे होत असताना श्रमिक , कष्टकरी, कामगार यांचे प्रश्न जैसे थे राहिले आहेत. त्यांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या लढाईची नव्याने डिझाईन करण्याची गरज निर्माण झाली आहे , असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार यांनी व्यक्त केले.

देवराष्ट्रे ( ता.कडेगाव ) येथील यशवंतराव चव्हाण सागरेश्वर अभयारण्य मध्ये क्रांतिसिंह नाना पाटील सभागृहात आयोजित केलेल्या वृक्षमित्र धो.म. मोहिते चॅरिटेबल ट्रस्ट व खानापूर - कडेगाव साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षमित्र धो.म. मोहिते पर्यावरण संवर्धन पुरस्कार सकाळचे वरिष्ठ बातमीदार जयसिंग कुंभार यांना सन्मानित करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ॲड. सुभाष पाटील, आनंदराव पाटील, सु.धो. मोहिते प्रमुख उपस्थित होते. जयसिंग कुंभार म्हणाले, वृक्षमित्र धो. म. अण्णांच्या यांचे व्याख्याने पत्रकारितेचं शिक्षण घेत असताना ऐकलेली आहेत. त्यांचे विचार पर्यावरण संवर्धनासाठी पूरक होते. शासनाने दोन महिन्यांपूर्वी संमत केलेल्या विधेयकामध्ये संरक्षण हा शब्द कमी केला आहे. वनाचे संवर्धन साठी घातक आहे.

यावेळी प्रारंभी सु.धो. मोहिते यांनी स्वागत केले. विश्वनाथ गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. यावेळी बी.टी.महिंद , मारूती शिरतोडे यांनी मनोगत व्यक्त केले. पुरस्कार वितरणास प्रा. बी. आर.कणसे , देवकुमार दुपटे, सुरेश चव्हाण, प्रशांत पवार, दीपक सुर्यवंशी, सुरेश मोहिते, इंद्रजीत पाटील, हिम्मत मलमे, महेश मदने , तुकाराम पवार यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# आटपाडीचा संविधान सप्ताह देश-विदेशात आटपाडीची मुख्य ओळख बनावा

आटपाडी : राजेंद्र खरात यांच्या पुढाकाराने गत आठ वर्षापासून सुरु असलेला संविधानाची महती तळागाळापर्यंत पोहचविणारा आटपाडीचा संविधान सप्ताह देश - विदेशात आटपाडीची मुख्य ओळख बनावा . असे गौरवपूर्ण उदगार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक विभागाचे महासचिव सादिक खाटीक यांनी काढले .

फुले शाहु आंबेडकर विचार मंच च्या वतीने गत ८ वर्षापासून दि . २० नोहेंबर ते २६ नोहेंबर या कालावधीत आटपाडी येथे संविधान सप्ताह साजरा केला जातो . या वर्षीच्या संविधान सप्ताह नियोजन बैठकीच्या अध्यक्ष स्थानावरून सादिक खाटीक बोलत होते . फुले शाहु आंबेडकर मंचचे अध्यक्ष राजेंद्र खरात यांच्या नेतृत्वाखाली ही बैठक संपन्न झाली .

भारतीय पिढ्यांना देशप्रेमी, देशाभिमानी, शहाणे जागरूक आणि आदर्श नागरीक बनविण्याचा संविधान सप्ताहाचा आटपाडीचा हा देशातला पहिला ठरलेला उपक्रम यापुढच्या काळात अधिकाधिक ताकद, उंची, उच्च दर्जाने साजरा करण्याचा आपला मानस असून संविधान दिनाच्या पंचाहत्तरीत प्रचंड ताकदीचे वर्षभर उपक्रम राबविण्याचा आपण प्रयत्न करणार असल्याचे मंचाचे अध्यक्ष राजेंद्र खरात यांनी स्पष्ट केले . अनेकांनी केलेल्या सुचनांची दखल घेत, कोणत्याच बाजूनी कमी न पडता यावर्षीचा सप्ताह मोठ्या दिमाखात व अनेक दिग्गजांच्या संविधानावरील मांडणीतून साजरा करणार असल्याचेही राजेंद्र खरात यांनी यावेळी सांगीतले .



सादिक खाटीक पुढे म्हणाले, प्रतिदिनीच्या छोट्या बचतीच्या मदरसा मदत डब्यांची संकल्पना या मंचाने अंमलात आणावी . ज्यायोगे सहजरित्या प्रतिवर्षी तीन ते चार लाख रुपये उपलब्ध होतील . सप्ताहात येणाऱ्या प्रत्येक वक्त्याला ऐकण्यासाठी राज्यातून हजारो लोक आटपाडीकडे यावेत, अशा देशभर नावलौकीक असणाऱ्या उत्तुंग व्यक्तीमत्वाच्या, प्रचंड अभ्यासू आणि अमोल वाणीच्या वक्त्यांना आमंत्रीत केले जावे . संविधान लोकाभिमुख होण्यासाठी वेगवेगळे उपक्रम, स्पर्धा, परिसंवाद, व्याख्यानमाला इत्यादीं गोष्टी वर्षभर संपूर्ण तालुक्यात राबवाव्यात . मुस्लीमांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी , सर्वतोपरी सहाय्य, संरक्षणासाठी संविधानच उपयोगी येणार असल्याने मुस्लीमांनी डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेला शिरोधार्य मानत संविधानाचा अभ्यास, जागर करणे सध्याच्या काळात गरजेचे बनले आहे .

संविधान सप्ताहाचा हा उपक्रम राष्ट्रीय विचारधारा बळकट करणारा आहे . जगभर वाखाणल्या जाणाऱ्या आणि दखल घेतल्या जाणाऱ्या या सप्ताहाच्या उपक्रमाने अनेकांना नवा आयाम मिळणार आहे . देश मजबुतीच्या या महत्वपूर्ण कार्याने अनेकांना राज्यसभा, विधानपरिषदेवर बोलावून घेऊन सन्मानीत केले जाईल असे कस्तुरीच्या सुगंधाच्या महतीचे महत्वपूर्ण कार्य यातून अप्रत्यक्षरित्या साधले जात असल्याचा अभिमानपूर्वक उल्लेख करून सादिक खाटीक यांनी, संविधान दिन आणि संविधान सप्ताह प्रत्येक भारतीयाने धार्मिक सण, धार्मिक उत्सवाच्या पवित्र भावनेतून, ओसंडून वाहणाऱ्या, उत्साह - आनंद आणि संविधानाप्रती समर्पित होत साजरा केला पाहीजे . असेही सादिक खाटीक यांनी शेवटी म्हंटले आहे. प्रारंभी स्वागत सुरेश मोटे सर यांनी तर प्रास्ताविक रणजित ऐवळे यांनी केले .

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

# गणेश मंडळांनी कायद्याचे पालन करावे



शिराळा : गणेशोत्सव काळात सर्व मंडळांनी कायदा व सुव्यवस्थेचे पालन करावे असे प्रतिपादन शिराळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सिद्धेश्वर जंगम यांनी केले. शिराळे खुर्द तालुका शिराळा येथे पुनवत, खवरेवाडी, शिराळे खुर्द,फुपेरे येथील गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत ते बोलत होते.शिराळे खुर्द येथील विठ्ठल मंदिरात मंडळांच्या सर्व कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली या बैठकीत सिद्धेश्वर जंगम यांनी मार्गदर्शन केले गणेशोत्सव काळात सर्व मंडळांनी कायद्याचे पालन करावे पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करावा दोन्ही प्रदर्शन पाणी प्रदूषण होणार नाही याची खबरदारी घ्यावी तसेच सर्व प्रकारच्या सोशल मीडियाच्या माध्यमातून कोणताही अनुचित प्रकार घडू नये याबाबत सर्व कार्यकर्त्यांनी कटाक्षाने लक्ष द्यावे अशी सूचना जंगम यांनी दिल्या त्याचबरोबर गणपती मूर्तींची विसर्जनापर्यंत संपूर्ण काळजी घ्यावी कुठेही विटंबाने सारखे प्रकार होऊ नयेत याबाबत सर्वांनी दक्षता बाळगावी असेही जंगम यांनी सांगितले.

या बैठकीस अंमलदार आनंदा जाधव, पोलीस कॉन्स्टेबल संदीप पाटील, सरपंच शर्मिला आंधळकर, पुनवतचे पोलीस पाटील बाबासाहेब वरेकर, फुपेरेचे पोलीस पाटील विजय पाटील, पोलीस पाटील अनिता पाटील ,जे. के. पाटील, फुपेरेचे तंटामुक्त समितीचे अध्यक्ष आनंदा पाटील , प्रदीप गायकवाड यांच्यासह परिसरातील सर्व मंडळांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जत तालुक्यात 'एक गाव, एक गणपती' मंडळांना गणेशमूर्ती भेट

जत तालुक्यात 'एक गाव, एक गणपती' ही संकल्पना राबविल्या जाणाऱ्या गावातील गणेश मंडळाना चिकलगी भुयार मठ (ता मंगळवेढा) येथील श्रीसंत बागडे बाबा मठाचे मठाधिपती, पाणी संघर्ष समितीचे अध्यक्ष तुकारामबाबा महाराज, शिवाजी वाटबरे महाराज यांच्या हस्ते ३९ गणेश मूर्ती वाटप केले. हा कार्यक्रम संख (ता जत) येथे झाला.या उपक्रमाला गणेश मंडळांनी चांगला प्रतिसाद दिला.

वैराग्य संपन्न श्रीसंत सद्गुरु श्रीसंत बागडेबाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त गणेश मंडळांना मोफत गणेश मूर्तींची वाटप एक गाव एक गणपती एक अनोखा उपक्रम अंर्तगत मंडळाना ३९ गणेश मूर्तीचे वाटप करण्यात आले.गणेश मूर्ती वाटपाचे १३ वे वर्षे आहे.संख येथील बागडेबाबा गुड्डापूर रोड येथे ३४ गणेश मूर्ती व चिकलगी भुयार मठ येथे ५ गणेश मूर्तीचे वाटप केले.

राष्ट्रीय संत गाडगेबाबा यांचे परमशिष्य श्री संत सयाजी बागडेबाबा यांच्या २९ व्या पुण्यतिथीनिमित्य चिक्कलगी (ता.मंगळवेढा) येथील भुयार मठात २१ सप्टेंबर स.९ ते ११ श्री भागवताचार्य शिवाजी महाराज, वाटंबेरे यांचे काल्याचे किर्तन व दुपारी १२.३० वाजता



फुले व गुलाल टाकून कार्यक्रमाची सांगता करण्यात होणार आहे.

यावेळी ह.भ.प तुकाराम महाराज म्हणाले, गणेश मंडळांना व तरुण पिढीला एक दिलासा म्हणून एक गाव एक गणपती उपक्रम गणेश मंडळांना श्रीसंत बागडेबाबा मानवमित्र संघटनेच्या वत्तीने गणपती विर्सजन दिवशी अपघाताचे प्रमाण लक्षात घेऊन मंडळांना हेल्मट देण्याचा एक अनोखा उपक्रम राबविणार आहे.दुष्काळावर दोन हात करण्याची ताकद द्यावी. यावर्षीचा गणेशोत्सव साध्या पध्दतीने करावा.सामाजिक बांधलिकी जपण्याचे गणपतीचे चरणी साकड घातले आहे.

देहू-आळंदीचे भाग्वतचार्य शिवाजी वाटबरे महाराज म्हणाले, तुकाराम महाराज जनसामान्यांच्या सुखदु:ख जाणून समस्या घेऊन लढत आहेत.इतर महाराज पेक्षा त्यांचे काम वेगळे आहे.दुष्काळी व सामाजिक काम आदर्शवादी आहे.सामाजिक कामामधून सामाजिक बांधलिकी जपली आहे.

यावेळी राजू सरगर,मेजर सिध्दू गायकवाड, दादा महाराज काटे, भाग्वतचार्य शिवाजी वाटबंरे आळंदी आनिल लोहार,महांतशे स्वामी, गंगाया स्वामी,समर्थ राठोळ उपस्थित होते.

# कै.चंद्रकला वेटम यांच्या स्मृतिदिनानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

शिराळा : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी चिकाटीने अभ्यास केला तर यश नक्की मिळते. त्यासाठी सतत प्रयत्न करायला हवा. तालुक्याची गुणवत्ता वाढवण्यासाठी अनेक आव्हानाला सामोरे जात आमच्या वाळवा तालुक्यातील शिक्षकांनी डॉ.पतंगराव कदम गुणवत्ता चाचणी, प्रज्ञाशोध परीक्षा शिष्यवृत्ती परीक्षा यामध्ये चांगली कामगिरी केली आहे. असे वक्तव्य गटशिक्षणाधिकारी अजिंक्य कुंभार यांनी केले.

इस्लामपूर ता. वाळवा येथील शिक्षक बँक सभागृहामध्ये आयोजीत कै. चंद्रकला वेटम यांच्या द्वितीय स्मृती दिनाच्या कार्यक्रमात बोलत होते . प्रास्ताविक शिक्षक संघाचे तालुकाध्यक्ष सुधाकर पाटील यांनी केले. आपल्या मनोगता मध्ये विस्ताराधिकारी छायादेवी माळी म्हणाले की वेटम कुटुंबाचे दातृत्व फार मोठे आहे. त्यांनी तालुक्यातल्या अनेक शाळांना बहुतेक सुविधा निर्माण करण्याचे काम केले आहे. त्यांचा आदर्श इतरांनी घेतला पाहिजे. वसंत शिंगारे ,राहुल पाटणे शिक्षक बँकेच्या व्हाईस चेअरमन अनिता



काटे यांनी मनोगत व्यक्त केली

कार्यक्रमात इयत्ता ५वी शिष्यवृत्ती परीक्षा गुणवत्ता यादीमध्ये आलेल्या मुलांचा सत्कार, जवाहर नवोदय विद्यालय मध्ये प्रवेश पात्र मुलांचा सत्कार,एम्बीबीएस, एन आय टी, आयआयटी प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच सरल सेवेतून वेगवेगळ्या पदावर नोकरीस लागलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार व राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक प्रसाद हसबनीस व जिल्हा आदर्श पुरस्कार शिक्षिका संगीता परीट तसेच शरद कुऱ्हाडे यांचा सत्कार वाळवा तालुका शिक्षक संघ व वेटम कुटुंबांच्या वतीने करण्यात आला त्यांनां मानपत्र, शाल, बुके ,रोख रक्कम देण्यात आली. सूत्रसंचालन आप्पासो जाधव यांनी तर आभार विकास निंबाळकर यांनी मांडले

या प्रसंगी संजय काटे,उमेश माने, दगडू येवले ,प्रवीण वेटम, शामराव वेटम, अमोल माने, शंभुराजे पाटील ,किरण पाटील ,आनंदराव पाटील,वनिता पाटील,सुरेखा पाटील सुप्रिया घोरपडे चंद्रकांत पाटील व एटम कुटुंबातील सदस्य उपस्थित होते

# खुले काव्यसम्मेलन मोठ्या उत्साहात संपन्न

शिराळा : शिराळा सारख्या छोट्याशा शहरात कवी संमेलन आयोजित केले जात आहे त्याचा बोध दुसऱ्या मोठ्या शहरांनी पण घ्यायला हवा व तरुण मित्र मंडळ तालुका वाचनालयाच्या शताब्दी वर्षा निमित्त कवी संमेलनाचे आयोजन ही बाब कौतुकास्पद आहे. दिवसभराची काव्य संमेलन विरळत चालली आहेत.

छोटी छोटी काव्यसम्मेलन होणं आजच्या सामाजाची गरज आहे आणि फक्त काव्यसम्मेलन ही एक नवी संस्कृती आपल्या भारतात उजळण्यास सुरवात झाली आहे आणि त्याच श्रेय वारणेचा वाघ साहित्य मंच,तिळ गंगा साहित्य परिवार अश्या संस्था काम करत आहेत असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी नाटककार रवी बावडेकर यांनी केले. शिराळा येथे आयोजित तरुण मित्र मंडळ तालुका वाचनालय आणि वारणेचा वाघ साहित्य मंच शिराळा यांच्या संयुक्त विद्यमाने आजोजित काव्य संमेलनलनाच्या अध्यक्ष पदावरून ते बोलत होते.

शिराळच्या तहसीलदार सौ शामला खोत-पाटील यांच्या हस्ते काव्यसम्मेलनाचे उदघाटन करून त्यांनी आपल्या स्वरचित कविता सादर करून नवोदित कवींना मार्गदर्शन केले.काव्यसमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले प्रसिद्ध कवी व वक्ते प्रकाश नाईक व प्रसिद्ध कवी मेहबूब जमादार यांनी आपले मनोगत व्यक्त करून कविता सादर केल्या.

कवी संमेलनात विक्रम, जाधव, महादेव हवालदार, कृष्णाकुर, संजय , नायकवडी, भीमराव कुंभार,मनीषा कुरणे,पूनम सावंत,संगीता आदाते,वैष्णवी खुर्द,नंदिनी हवालदार,वसुधा सुर्वे,विनायक कुलकर्णी, सुरेश मुळीक,हिम्मठराव पाटील,सुरेश पाटील,अरुण बंदसोडे यांनी बहारदार कविता सादर केल्या.

# माधवनगर धरणातून पाण्याचा विसर्ग करावा



सांगली : गणेशत्सवात माधवनगर सहित बुधगाव व इतर गावातील पाणी पुरवठा बंद झाला आहे. कृष्णा नदीतील पाणी पातळी घटली असून नदीचे पात्र कोरडे पडले आहे. यामुळे नागरिकांचे हाल होत असून धरणातून पाण्याचा विसर्ग करावा अशी मागणी माधवनगरच्या सरपंच अंजू तोरो यांनी केली आहे. यंदाचा गणेशोत्सव उत्साहाने साजरा केला जात आहे.यातच पाणी टंचाईमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत, पावसाअभावी ग्रामीण भागातील शेतकरी सुद्धा चिंतेत आहे.यातच नदीचे पात्र कोरडे पडले आहे, यामुळे पिण्याच्या पाण्याबरोबरच शेतीचे सुद्धा नुकसान होत आहे,एक महिन्याच्या कालावधीत दोन वेळा पावसाळ्यातच नदी कोरडी पडली होती.तरी शासनाने याचा गांभीर्याने विचार करून नियोजपूर्वक धरणातून पाण्याचा विसर्ग करावा अशी मागणी एका पत्रकाद्वारे करण्यात आली आहे.

# भिलवडीत गणराया बरोबर पावसाचेही आगमन

## शेतकरी वर्गाबरोबर गणेश भक्तांमध्ये उत्सहाचे वातावरण

भिलवडी कृष्णा काठावरील भिलवडी (ता.पलूस) येथे मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात लाडक्या गणरायाचे आगमन झाले.गणरायाच्या आगमनाची लहानमुलांसह सर्वच गणेश भक्त अगदी आतुरतेने वाट पाहत होते.गणेश भक्तांची प्रतिक्षा संपली आणि गणरायाचे आगमन झाले.गणरायाचे आगमन होताच सर्वच भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात गणरायाचे स्वागत केले.

भिलवडी येथील गणेश भक्तांनी घरगुती गणपती व विविध गणेश मंडळांनी आपल्या लाडक्या गणरायाचे फटाक्यांची आतिषबाजी व पारंपारिक वाद्यांसह मोठ्या जल्लोषात स्वागत केले.सकाळपासूनच गणरायाच्या स्वागतासाठी बालचमू फारच अतुर असल्याचे दिसून आले.आपल्या आईवडील व घरातील नातलगांसह मित्रांच्या सोबतीने गणरायांना आणण्यासाठी डोक्यावरती टोपी,मुखात गणरायाचा जयघोष करीत, बालकवर्ग भिलवडी येथील गणेश मुर्ती विक्री स्टॉलवरून आपली मनपसंत गणेश मुर्ती घेऊन मोठ्या भक्तिभावाने घरी येत होते.

काही मंडळाच्या गणपतींचे



गणेश चतुर्थीच्या पुर्वसंध्येला व गणेश चतुर्थी दिवशी डॉल्बीच्या दण - दणाटात, फटाक्यांच्या आतषबाजीमध्ये आगमन झाले तर काही गणेश मंडळांनी डॉल्बीला फाटा देत हालगी, ताशे, धनगरी ढोल, सनई चौघडे, तुतारी अशी लोककला जोपासणारी पारंपरिक वाद्य वाजवत, गणरायाचे स्वागत करून, लोककलेची परंपरा जोपासण्याचा प्रयत्न केला.आकर्षक, सुबक व मनमोहक अशा गणरायांच्या विविध वेषांतील मोठ्या उंचीच्या मूर्तींचे सजविलेल्या वाहनांमधून, फटाक्यांच्या आतषबाजीमध्ये सवाद्य आगमन झाले.श्रींच्या स्थापनेच्या ठिकाणी महिला भक्तांनी फुलांची सजावट व आकर्षक अशी रांगोळी काढली होती.सर्वच गणेश मंडळांनी आकर्षक अशी विद्युत रोषणाई केली होती. रंगीबेरंगी विद्युत रोषणाईने सारा परिसर उजळून निघाला होता. गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरयाच्या गजरात मोठ्या भक्तिमय वातावरणात श्रींची प्रतिष्ठापना करण्यात आली. यानंतर सर्वत्र श्रींची आरती संपन्न झाली.यावेळी भिलवडीसह सर्व परिसर गणेशमय झाला होता. गणरायाच्या आगमना बरोबरच भिलवडी येथे पावसाने ही हजेरी लावली.त्यामुळे सध्या तरी शेतकऱ्यांना पाऊस पडणारच असा विश्वास वाटू लागला आहे.त्यामुळे गणरायाच्या आगमनाने शेतकऱ्यांबरोबरच गणेश भक्तांमध्येही मोठा उत्साह संचारला असल्याचे दिसून येत आहे.

# पृथ्वीराज पाटील यांची जैन समाजाप्रती वात्सल्य भावना आणि मनस्वी शांतीसागर भक्ती..!

मिरज : मिरजेत वीर सेवा दल मध्यवर्ती समितीच्या वतीने प्रथमाचार्य शांतीसागर महाराजांची ६८ वी पुण्यतिथी दि. १७सप्टेंबर रोजी श्रध्दापूर्वक साजरी झाली. अथांग जनसागर उपस्थित होता. हा कार्यक्रम म्हणजे जैन समाज व संस्कृतीचा मानबिंदू आहे..!

याच दिवशी सांगलीत मराठा समाज आपल्या न्याय्य आरक्षण हक्कासाठी महामोर्चा काढून सविनय मार्गाने रस्त्यावर उतरला होता. या मोर्चाच्या धांदलीत पृथ्वीराज पाटील बाबा व्यस्त असतानाही त्यांनी खास वेळ काढून मिरजेत न्यू इंग्लिश स्कूलच्या भव्य मंडपात दाखल होऊन स्वस्तिश्री भट्टारक पट्टाचार्य जिनसेन महाराज व स्वस्तिश्री भट्टारक पट्टाचार्य लक्ष्मीसेन महाराज यांना आत्यंतिक श्रध्दापूर्वक नमन केले..

विसाव्या शतकातील प्रथमाचार्य शांतीसागर महाराजांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होऊन तमाम उपस्थित अहिंसाप्रेमी जैन समाजाला बाबांनी नमस्कार करुन जैन संस्कृती.. तत्वज्ञान.. मुनी परंपरा गौरव केला. यावेळी महाराष्ट्राचे माजी आरोग्य राज्यमंत्री डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर यांच्या हस्ते जैन समाजाच्या वतीने पृथ्वीराज



बाबांचा सत्कार करण्यात आला. शांतीपिठावर स्थानापन्न झाल्यानंतर बाबांनी युवा नेते मा. उत्तम पाटील यांच्याशी संवाद साधला. बाबा म्हणाले, 'प्रथमाचार्य शांतीसागर महाराजांनी जैन व जैनेतर समाजाचे कल्याणकारी प्रबोधन केले.. ते शांतीदूत होते.. भारतीय संस्कृती आणि जैन संस्कृती वैभव वाढवण्यासाठी त्यांनी भारतभर ३२०००कि.मी.चा विहार करत आत्मकल्याणाबरोबर जनकल्याणकारी कार्य केले. त्यांचे विचारच जगाला संकटातून वाचवू शकतात.

दक्षिण भारत जैन सभेच्या शंभराव्या अधिवेशनास पृथ्वीराज पाटील बाबांनी लक्ष रुपयांची बृहत धनराशी दिली होती तसेच जैन समाजाच्या प्रश्नावर ते संवेदनशील राहूल मदत करतात. अशा मानवतावादी लोकनेत्यांच्या उपस्थितीमुळे पुण्यतिथी महोत्सवाचे महत्त्व अधोरेखित झाले आहे एवढे मात्र निश्चित..!

# स्व. शिवाजीराव देशमुखांना जयंतीला अभिवादन

शिराळा : १९५६ मध्ये स्व शिवाजीराव देशमुख साहेबांची सांगली जिल्ह्यात विस्ताराधिकारी म्हणून शासकीय सेवेला सुरुवात झाली होती. १९६७ मध्ये बिळाशी जिल्हा परिषद मतदार संघातून ते जिल्हा परिषदेवर बिनविरोधपणे निवडून आले होते.१९६७ मध्ये 'कोयना' येथे झालेल्या भूकंपामुळे विस्थापित झालेल्या शिराळा तालुक्यातील दुर्गम भागात त्यांनी मदतकार्य राबविले होते. काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते स्वर्गीय वसंतदादा पाटील यांचे ते खंदेसमर्थक म्हणून महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर त्यांची वेगळी ओळखत होती.

सन २००४, २००८ मध्ये त्यांची महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेच्या सभापती पदी बिनविरोधपणे निवड झाली होती. राज्य मंत्रीमंडळात त्यांनी सामान्य प्रशासन, ग्रह, माहिती व जनसंपर्क, परिवहन, कृषी,ऊर्जा, अन्न व नागरी पुरवठा अशा विविध खात्यांचे त्यांनी राज्यमंत्रीपद भूषविले होते. विशेषतः डोंगरी विकास योजनेच्या माध्यमातून राज्यातील ४० तालुक्यांच्या विकासासाठी त्यांनी घेतलेला पुढाकार सर्व तालुक्यांसाठी लोकाभिमुख ठरला होता.स्व शिवाजीराव देशमुखांची सन २००४, २००८ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेच्या सभापती पदी बिनविरोधपणे निवड झाली होती. राज्य मंत्रीमंडळात त्यांनी सामान्य प्रशासन, ग्रह, माहिती व जनसंपर्क, परिवहन, कृषी,ऊर्जा, अन्न व नागरी पुरवठा अशा विविध खात्यांचे त्यांनी राज्यमंत्रीपद भूषविले होते. विशेषतः डोंगरी विकास योजनेच्या माध्यमातून राज्यातील ४० तालुक्यांच्या विकासासाठी त्यांनी घेतलेला पुढाकार सर्व तालुक्यांसाठी लोकाभिमुख ठरला होता.

# भक्तीमय वातावरणात गणरायाचे आगमन

गांधीनगर : गांधीनगर मध्ये गणरायाचे आगमन घरोघरी आनंदाच्या वातावरणात स्वागत झाले. मंडळाच्या गणपतीचे आगमन डॉल्बीचा दणदणाट, पारंपरिक वाद्यांच्या निनादात घरगुती गणरायाचे गांधीनगरसह परिसरात आज मंगळवारी भक्तिमय वातावरणात उत्साहात आगमन झाले. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या गणेशमूर्तींचेही आगमन रात्री उशिरापर्यंत सुरू राहिले.

गांधीनगर, गडमुडशिंगी, चिंचवाड, वळीवडे, निगडेवाडी येथील गणेशभक्तांनी वाजत

गाजत सुंदर सजावट करून घरोघरी आपल्या लाडक्या गणपतीबाप्पाची प्राणप्रतिष्ठापना केली. गांधीनगरमध्ये मोठ्या प्रमाणात नाशिक येथून पारंपरिक वाद्याची ढोलपथके आली आहेत. या ढोलपथकांचा आगमन मिरवणुकीत लक्षणीय सहभाग राहिला. सकाळपासूनच गणेशाच्या आगमनाची परिसरात लगबग सुरू राहिली. आरास, सुंदर सजावट आणि नयनमनोहर रांगोळ्या रेखाटण्यात गणेशभक्त तल्लीन झाले. घरोघरी आणि गलोगल्ली गणेशभक्त आपल्या लाडक्या गणरायाच्या स्वागतासाठी सज्ज होते. रात्री उशिरापर्यंत आगमन मिरवणुका सुरू राहिल्या.

# बक्षीसासाठीच नव्हे तर गावाच्या विकासासाठी काम करा

घाटनांद्रे : केवळ बक्षीसासाठीच नव्हे तर गावाच्या विकासासाठी प्रत्येकांनी झपाटून काम केले पाहिजे,त्यामुळे पुढे होणार हे सर्व चांगलेच आसते असे प्रतिपादन पुणे विभागीय आयुक्त कार्यालयातील विभागीय तांत्रिक तज्ञ (विकास) श्रीम गौरी पाटील यांनी घाटनांद्रे (ता कवठेमहांकाळ) येथील ग्रामपंचायत कार्यालयात माझी वसुंधरा अभियानांतर्गत कामाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या ग्रामस्थांच्या बैठकीत केले.यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना गौरी पाटील पुढे म्हणाल्या की पृथ्वी,वायू,जल,अग्नी व आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वावरच माझी वसुंधरा अभियान ४.० ची सुरुवात झाली आसुन त्याचे संवर्धन व संरक्षण राखणे हे आपणा सर्वांचेच काम आहे.तर जिल्हा परिषद अभियान कक्षातील दतात्रय गळवे यांनीही पृथ्वी,वायू,अग्नी,जल व आकाश या पंचतत्वानुसार माझी वसुंधरा अभियानासाठी करावयाच्या



कामाची सविस्तर माहिती यावेळी विशद केली.तर गावाने माझी वसुंधरा अभियानांतर्गत केलेल्या कामाचेही त्यांनी भरभरून कौतुक केले.

यावेळी सरपंच अमर शिंदे, उपसरपंच सुनील कांबळे, ग्रामपंचायत सदस्य सर्वश्री अभिजित शिंदे,सागर पाटील, दिलीप शिंदे,सौ दिव्या शिंदे,सौ पवित्रा शिंदे,सौ सुमन शिंदे,श्रीमती सावित्रीबाई कांबळे,सौ विद्याराणी पवार,सोसायटीचे चेअरमन प्रल्हाद ( आण्णा) शिंदे, तंटामुक्तीचे कुलदीप शिंदे, ग्रामसेवक झैलसिंग पावरा, तलाठी वायदंडेसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना पर्यावरण पूरक शपथही देण्यात आली.आभार सुनील कांबळे यांनी मानले.त्याचबरोबर गौरी पाटील व दळवी यांनी गावात माझी वसुंधरा अभियानांतर्गत चाललेल्या वेगवेगळ्या कामानाही भेटी देऊन समाधान व्यक्त केले.

# नांगोळे येथे पर्यावरण पूरक गणपतीचे प्रदर्शन



घाटनांद्रे : नांगोळे (ता कवठेमहांकाळ) ग्रामपंचायतीच्या माझी वसुंधरा ४.० या अभियानांतर्गत केलेल्या आवाहनानुसार जिल्हा परिषद शाळा व आदर्श विद्यालयातील विद्यार्थ्यांनी बनवलेल्या श्याडुच्या मातीपासून पर्यावरण पूरक गणपतीच्या मूर्तींचे प्रदर्शन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.याला ग्रामस्थांनीही मोठा प्रतिसाद दिला.

यावेळी सुमारे २५० शाळेच्या विद्यार्थ्यांनी बनवलेल्या पर्यावरण पूरक गणेश मूर्ती प्रदर्शनात ठेवल्या होत्या.यावेळी गावकऱ्यांनीही आपल्या गावातील विद्यार्थ्यांनी बनवलेल्या पर्यावरण पूरक गणपतीच्या मूर्त्या खरेदी केल्या व त्याचे विसर्जनही 'मेरी मिट्टी मेरा देश' या योजनेतून तयार केलेल्या अमृत रोपवाटिकेत माझी वसुंधरा योजनेंतर्गत तयार करण्यात आलेल्या कृत्रिम तलावात विसर्जन करणार असल्याचे सांगितले.त्याचबरोबर गणेश मुर्तीला वाहीले गेलेले निर्माल्यही ग्रामपंचायतीच्या वतीने तयार करण्यात आलेल्या निर्मल्यकलशात टाकणार आसल्याचे सांगितले.

सदर प्रदर्शनास गटविकास अधिकारी उदयकुमार कुसूरकर,ग्रामपंचायत विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर गुरव,माजी उपसभापती दादासाहेब कोळेकर, सरपंच सौ छायाताई कोळेकर, उपसरपंच दादासो हुबाले, सोसायटीचे चेअरमन राकेश कोळेकरसह ग्रामपंचायत सदस्य यांनी भेट देऊन समाधान व्यक्त केले.तर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सदर प्रदर्शनात अगदी उत्कृष्ट मुर्ती बनविणार्या विद्यार्थ्यांना ग्रामपंचायतीच्या वतीने सन्मान चिन्ह तर प्रदर्शनात सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक तुकाराम मासाळसह सर्व शिक्षक,विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.स्वागत दादासो हुबाले यांनी तर आभार धनश्री पोळ-पाटील यांनी मानले.



**रिळेसह परिसरातील मांगरुळ, रिळे, फुपेरे, शिराळेखुर्द, खवरेवाडी, कणदूर, पुनवत, बेलेवाडी, मोरेवाडी, शिंदेवाडी, धसवाडी, कुसाईवाडी, दुरूंदेवाडी आदी गावांमध्ये घरगुती, श्री गणेश मंडळातील श्री गणेशाचे जल्लोषी स्वागत करण्यात आले. मंडळातील कार्यकर्त्यांचा श्री गणेशाच्या आगमनासाठी मोठा उत्साह दिसून येत होता. श्रींच्या आगमनाला विशेषतः पारंपरिक वाद्ये होती.**

# दोन लाखांचा गुटखा जप्त : गणपती पेठेत झाली कारवाई




सांगली : अन्न औषध प्रशासनाने शहरातील गणपती पेठेत कारवाई करत प्रतिबंधित सुगंधी तंबाखु आणि गटख्याचा साठा जप्त केला. सुमारे २ लाख १५ हजार रुपयांचे हे साहित्य असून याप्रकरणी संशयीत बिरमा करमचंद गिडवाणी याच्याविरुध्द शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अन्नसुरक्षा अधिकारी चन्नवीर स्वामी यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार , अन्न औषध प्रशासनाला गणपती पेठेतील माॅ बिल्डींगमधील श्री. झुलेलाल एंटरप्राईजेस मध्ये प्रतिबंधित सुगंधी तंबाखु आणि गुटख्याचा साठा असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे अन्न औषध प्रशासनाच्या पथकाने त्या ठिकाणी कारवाई केली. कारवाईच्या दरम्यान संशयीतांनी अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ च्या कलमातील तरतुदींचा भंग केल्याचे स्पष्ट झाले. ही कारवाई जुलै महिन्यात करण्यात आली होती. त्यानंतर सोमवारी संबधित एन्टरप्राईजेसचे चालक, संचालक, भागीदार आणि जबाबदार व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे

# बोरगाव येथे पर्यावरण पूरक गणेश मूर्तींची कार्यशाळा संपन्न

घाटनांद्रे : माझी वसुंधरा अभियान ४.० या योजनेअंतर्गत बोरगाव (ता कवठेमहांकाळ) ग्रामपंचायतीच्या वतीने पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनविण्यासाठीची कार्यशाळा संपन्न झाली.यावेळी विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बोरगाव येथील जिल्हा परिषद शाळेत घेण्यात आलेल्या या कार्यशाळेत उपस्थित विद्यार्थी व ग्रामस्थांना पर्यावरण पूरक गणेश मूर्तींचे फायदे व माझी वसुंधरा योजनेबाबतची माहिती देण्यात आली.यावेळी मुर्तीकार कुंभार यांनी साडूच्या माती पासून पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनविण्याचे उपस्थितांना प्रात्यक्षिक करून दाखवले.



यावेळी बोलताना मुर्तीकार कुंभार म्हणाले की श्याडूच्या मातीपासून बनवली जाणारी गणेश मूर्ती ही अगदी पर्यावरण पूरक असून यामध्ये कोणत्याही प्रकारच्या केमिकलचा वापर केला जात नाही.त्यामुळे ही मूर्ती पाण्यात टाकल्यास पटकन विरघळत असल्याने सदर मुर्तीची कोणत्याही प्रकारची विटंबना होत नाही.उलट प्लॅस्टर ऑफ पॅरिस अथवा इतर रसायन वापरून बनविलेल्या मुर्त्या या पुर्णतः विरघळण्यास बराच कालावधी लागतो.त्यामुळे अश्या मुर्त्या पाण्यावर तरंगतात त्याचबरोबर त्या पाण्याच्या कडेला भग्नावस्थेत तश्याच पडून रहातात.तेव्हा पर्यावरण पूरक गणेश मूर्ती वापरणेच ईष्ट आसल्याचे सांगितले.

विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पर्यावरण पूरक गणेश मूर्त्या व सजावटीचे साहित्य याचे प्रदर्शनही शाळेत भरविले व त्यातून विक्रीही करण्यात आली.याचवेळी उत्कृष्ट गणेश मूर्ती बनविण्यार्या विद्यार्थ्यांचा ग्रामपंचायतीच्या वतीने उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी जेष्ठ नेते जनार्दन पाटील,सरपंच सौ स्मिता पाटील,उपसरपंच सुजित पाटील, ग्रामपंचायत सदस्य सर्वश्री संतोष पाटील,रमेश जाधव,वनिता माने,सरस्वती पवार,माजी सरपंच नितीन पाटील,माजी उपसरपंच नामदेव पाटील,ग्रामसेवक सुधीर बनसोडेसह शिक्षक,पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.शेवटी ग्रामसेवक सुधीर बनसोडे यांनी आभार मानले.




# कवठेमहांकाळ मध्ये नव्याने सुरू झालेल्या वर्षा क्रिएशन या कापड दुकान चे उद्घाटन



कवठेमंकाळ : महाकाली साखर कारखाना रोड अंबिका पेट्रोल पंप शेजारी नव्याने सुरू झालेल्या वर्षा क्रिएशन या लेडीज कापड दुकानाचे उद्घाटन नगरपंचायतच्या नगराध्यक्ष सिंधुताई गावडे तसेच तहसीलदार अर्चना कापसे मॅडम फित कापून केले. यावेळी आलेल्या सर्व मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. या कार्यक्रमाचे खास आकर्षण व प्रमुख उपस्थिती youtube रील स्टार दिलवाली अकी प्रज्ञा चौगुले व अक्षय चौगुले हे उपस्थित होते. या कार्यक्रमाला कवठेमंकाळ पोलीस स्टेशन पीआय ज्योतीराम पाटील साहेब, जमादार साहेब, राष्ट्रहित न्यूज चॅनेल चे शरद माळी, अंकली साखर कारखाना संचालक श्रीयुत पाटील, राष्ट्रवादी महिला सदस्य प्रमिला पाटील, सुरेखाताई कोळेकर, व वर्षा क्रिएशनचे मालक वर्षाने माळी, शशिकांत माळी, विठुराईवाडीचे सरपंच अमित चव्हाण, तसेच सर्व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीमध्ये हा उद्घाटन सोहळा पार पडला.

# रिळ्यात गणेशोत्सवाला विविधांगी उपक्रम

शिराळा : रिळे ( ता. शिराळा ) येथे अभिनव कला क्रीडा सांस्कृतिक मंडळ यांचेवतीने श्री गणेशोत्सव कार्यकाळात विविधांगी उपक्रम राबविले जाणार आहेत. यंदा श्री गणेश मंडळाचे रौप्य महोत्सवी (२५) वर्ष आहे.

स्थापनेपासून श्री गणेश मंडळाने कोणत्याही कर्णकर्कश ध्वनी क्षेपकांचा श्री गणेशाच्या आगमनाला, विसर्जनाला वापर केलेला नाही. आगमनाला, विसर्जनाला लेझीम, हालगी, धनगरी ढोल, टाळमृदृंग, झांजपथक आदींचा वापर केला जातो. राजर्षी छत्रपती शाहू महाराज, छत्रपती शिवराय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा, सावित्रीबाई फुले यांच्या वैचारिक विचारांची गणेशोत्सव कार्यकाळात जनजागृती केली जाते.

बुधवार (ता.२० ) श्री स्वामी समर्थ महिला केंद्र यांच्यावतीने नित्य सेवा कार्यक्रम आहे. गुरुवार (ता.२१) सकाळच्या सत्रात मुलांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन आहे. शुक्रवारी (ता.२२) महिलांसाठी 'गौरी' गीते, पारंपारिक खेळ स्पर्धा आहेत. शनिवारी (ता.२३) सायंकाळी चैत्राली निर्मित इस्लामपूर 'स्वरगंधार' हिंदी, मराठी गीतांचा कार्यक्रम आहे. रविवारी (ता.२४) सकाळी पूजाप्रसाद आहे. सायंकाळी पाच ते सहाला महिलांसाठी सौभाग्य औक्षण 'हळदीकुंकू' आहे. संध्याकाळी 'कवि संमेलन' आहे. सोमवार (ता.२५) खुल्या गटासाठी रांगोळी स्पर्धा आहेत. बुधवारी सकळीच पारंपारिक वाद्ये,गीते, विविधांगी राष्ट्रीय नेते वेशभूषांनी श्रींच्या विसर्जन होणार असल्याची माहिती मंडळ संयोजकांनी दिली.




## जाहीर टेंडर नोटीस २०२३-२४

ग्रामपंचायत दिघंची, ता-आटपाडी, जि-सांगली येथील खालील कामांसाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून मोहरबंद निविदा ब-१ करारावर मागविणेत येते आहेत. तरी खाली नमूद केलेल्याकामासमोर दर्शविलेल्या तारखेच्या कालावधीमध्ये निविदा मागणी अर्ज दिले नंतर निविदा फॉर्म दिले जातील. तसेचमुदतीत आलेल्या निविदाचाच फक्त विचार केला जाईल. लिफाफा क्र (१) तांत्रिक लिफाफा क्र २) आर्थिक लिफापा १५ वा वित्त आयोग योजने अंतर्गत मंजूर २०२१-२२ व २०२२-२३ मधील

| अ.क्र | कामाचे नाव | कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | निविदा प्रकार | निविदा फार्म फी रक्कम रुपये | बयाना रक्कम रुपये १% | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख | भरलेल्या निविदा सिकृतीची तारीख व वेळ | कामाची मुदत | मक्तेदार प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दिघंची ता. आटपाडी येथे रमेश सागर घर ते राजेंद्र यादव घर सिमेंट कॉक्रेट रस्ता करणे. | ३०००००/- | ब -१ | १००/- | ३०००/- | २०-९-२०२३ | २९-९-२०२३ वेळ ५.०० वाजे पर्यत | ३ महिने | सुभे |
| २ | दिघंची ता. आटपाडी येथील वार्ड नं. ३ मध्ये अंतर्गत रस्ते, गटर व पेव्हिंग ब्लॉक बसवणे. | ३००४३२/- | ब -१ | १००/- | ३००४/- | २०-९-२०२३ | २९-९-२०२३ वेळ ५.०० वाजे पर्यत | ३ महिने | खुला |
| ३ | दिघंची ता.आटपाडी येथे शिवाजी मोरे घर ते भांबुरे घर अंतर्गत रस्ते, गटर व पेव्हिंग ब्लॉक बसवणे. | ३००००१/- | ब -१ | १००/- | ३००१/- | २०-९-२०२३ | २९-९-२०२३ वेळ ५.०० वाजे पर्यत | ३ महिने | खुला |
| ४ | दिघंची ता. आटपाडी येथे अजित दिक्षित घर ते पोतदार घर अंतर्गत रस्ते, गटर व पेव्हिंग ब्लॉक बसवणे. | ३००४३२/- | ब -१ | १००/- | ३००४/- | २०-९-२०२३ | २९-९-२०२३ वेळ ५.०० वाजे पर्यत | ३ महिने | खुला |
| ५ | दिघंची ता. आटपाडी येथे गावठाण अंतर्गत अजित गोडबोले घर ते विष्णू म्हेत्रे घर परिसरात बंदिस्त गटर करणे. | ९९९९९९/- | ब -१ | २००/- | ९९९९/- | २०-९-२०२३ | २९-९-२०२३ वेळ ५.०० वाजे पर्यत | ३ महिने | सुभे |
| ६ | दिघंची ता. आटपाडी येथे नवशाडद जमादार घर ते विकास मेंकुदळे घर परिसरात गटर करणे. | ५०००००/- | ब -१ | १००/- | ५०००/- | २०-९-२०२३ | २९-९-२०२३ वेळ ५.०० वाजे पर्यत | ३ महिने | खुला |
| ७ | दिघंची ता. आटपाडी येथील वार्ड नं. ४ मध्ये सिंधू पाटोळे घर ते बाळासाहेब मोरे घर बंदिस्त गटर करणे. | ४०००००/- | ब -१ | १००/- | ४०००/- | २०-९-२०२३ | २९-९-२०२३ वेळ ५.०० वाजे पर्यत | ३ महिने | खुला |
| ८ | दिघंची ता. आटपाडी येथे महादेव म्हेत्रे घर ते रामदास सुतार घर अंतर्गत रस्ते, गटर व पेव्हिंग ब्लॉक बसवणे. | ३००००१/- | ब -१ | १००/- | ३००१/- | २०-९-२०२३ | २९-९-२०२३ वेळ ५.०० वाजे पर्यत | ३ महिने | मजुर सह. संस्था |
| ९ | दिघंची ता.आटपाडी येथे लोहार वाडा अंतर्गत पेव्हिंग ब्लॉक बसवणे. | २९९९९८/- | ब -१ | १००/- | २९९८/- | २०-९-२०२३ | २९-९-२०२३ वेळ ५.०० वाजे पर्यत | ३ महिने | मजुर सह. संस्था |
| १० | दिघंची ता.आटपाडी येथे मुलाणी वाडा येथे पेव्हिंग ब्लॉक बसवणे. | २६४८७०/- | ब -१ | १००/- | २६४८/- | २०-९-२०२३ | २९-९-२०२३ वेळ ५.०० वाजे पर्यत | ३ महिने | मजुर सह. संस्था |
| ११ | दिघंची ता.आटपाडी येथील वार्ड नं. २ मध्ये दुर्गा माता मंदिर परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसवणे. | ३००००३/- | ब -१ | १००/- | ३००३/- | २०-९-२०२३ | २९-९-२०२३ वेळ ५.०० वाजे पर्यत | ३ महिने | मजुर सह. संस्था |
| १२ | दिघंची ता.आटपाडी येथे नाईक समाज ते विठ्ठल बुधावले घर अंतर्गत पेव्हिंग ब्लॉक बसवणे. | ४०००१९/- | ब -१ | १००/- | ४०१९/- | २०-९-२०२३ | २९-९-२०२३ वेळ ५.०० वाजे पर्यत | ३ महिने | मजुर सह. संस्था |

अटी व शर्ती १) सदर निविदा स्वीकारणे अगर नाकारणेचा हक्क खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे. २) सविस्तर निविदा सुचना ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील. ३) पूर्ण भरलेला मोहरबंद निविदा फॉर्म सोबत लिफाफा क्र (१) मध्ये १) निवेदा फी आणि बयाना रक्कम भरलेली पावती २) पॅन कार्ड ३) नझ/चत्रझ व्यवसाय नोदणी प्रमाणपत्र /बांधकाम नोदणी प्रमाणपत्र ४) जीएसटी नोदणी प्रमाणपत्र ५) इन्कम टक्स रिटर्न ६) निविदेतील अटी शर्ती मान्य असलेचे हमी पत्र सोबत जोडावे ८) सदरचे काम उपअभियंता सो. पं. स. आटपाडी यांचे मार्गदर्शनव सूचनेप्रमाणे व दिलेल्या मुदतीत पूर्ण करणेचे आहे. ९) सदर कामाचे बिल मुल्याकन प्राप्त झालेनंतर अदा केले जाईल. १०) कामाच्या बिलातून शासकीय नियमाप्रमाणे आवश्यक त्या सर्व कपातीच्या रक्कमा कपात करूनच बिल अदा केले जाईल. ११) सुरु असलेल्या कामाचे दाखले सोबत जोडावीत १२) यापूर्वी केलेली कामे (कामाचा अनुभव) काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत.

लिफाफा क्रमांक (२) सोबत (अ) टेंडर फॉर्म सही सह (ब) परफॉर्मन्स सुरक्षा अनामत रक्कम डी.डी. अथवा बँक गारंटी

XXX
ग्रामसेवकग्रामपंचायत दिघंची
ता. आटपाडी जि. सांगली

XXX
सरपंच ग्रामपंचायत दिघंची
ता. आटपाडी जि. सांगली